<u>**पुढील सरतपास वादीतर्फे वकील श्री.एस.आर.ओगले यांचे मार्फत शपथेवर सुरु–**</u>

**०९.** मी निशाणी ४/१ व निशाणी ४/२ येथे सर्वे नं. २/३/६२/१ व सर्वे नं. ९/२१ च्या सातबारा उताऱ्यांच्या सहीसूद नक्कला सादर केल्या आहेत. (सदर सातबारे उतारे हे सार्वजनिक दस्तऐवज असल्याने त्यांना अनुक्रमे <u>**निशाणी १७ व १८**</u> देण्यात येते.) मी निशाणी ४/३ येथे घर नं. ५०७ चा घरपत्रक उताऱ्याची सहीसूद नक्कल सादर केली आहे. (सदर उतारा हा सार्वजनिक दस्तऐवज असल्याने त्याला <u>**निशाणी १९**</u> देण्यात येते.) मी निशाणी ४/४ येथे दि. २१/०६/२०११ रोजीच्या मृत्यूपत्राची सहीसूद नक्कल सादर केलेली आहे. सदरचे मृत्यूपत्र मला मान्य नाही. (सदर मृत्यूपत्रास <u>**ओळखीपुरते**</u> <u>**निशाणी २०**</u> देण्यात येते.) मी निशाणी ४/५ येथे विवादग्रस्त प्रकरणांची नोंदवहीमधील फेरफार क्रमांक ५०८ व त्यावरील मंडळ अधिकारी शिरोडा यांचा आदेश असलेल्या उताऱ्याची सहीसूद नक्कल सादर केलेली आहे. (सदर उतारा हा सार्वजनिक दस्तऐवज असल्याने त्याला <u>**निशाणी २१**</u> देण्यात येते.) मी निशाणी ४/६ येथे शिरोडा ग्रामपंचायत घर क्र. २/८४ अ च्या घरपत्रक उताऱ्यामध्ये बदल करण्यासाठी माझ्या वडिलांनी दिलेल्या अर्जाची सहीसूद नक्कल सादर केलेली आहे. (सदरचा अर्ज मूळप्रतीत नसल्याने त्याला निशाणी देता येणार नाही. )

**(वादीतर्फे वकिलांच्या तोंडीविनंतीवरुन पुढील सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.)**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/–
(के.के.पाटील)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.

दिनांक– २८/०९/२०२२.